# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः10.04.2025** **वारःगुरुवार**

---

1.भारत फ्रान्सकडून २६ राफेल विमानं खरेदी करणार

2.तिरुपती-पकला-कटपाडी रेल्वे मार्गाच्या दु-पदरीकरणाला केंद्रीय मंत्रीमंडळाची मंजुरी

3.राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आणि सोल्वाकियाचे राष्ट्राध्यक्ष पीटर पेलेग्रिनी यांच्यात बैठका, चर्चा आणि सामंजस्य करार

आणि

4.चीन वगळता सर्व देशांसाठीच्या प्रत्युतर करावर ९० दिवसांचा विराम देण्याची - अमेरिकेची घोषणा

**<u>राफेल</u>**

भारत फ्रान्सकडून २६ राफेल सागरी लढाऊ विमानं लवकरच खरेदी करणार आहे. या २६ राफेल विमानांपैकी २२ विमानं एक आसनी आणि चार विमानं दोन आसनी आहेत. भारतीय नौदलाच्या गरजेनुसार त्याची रचना करण्यात येईल असं संरक्षण सूत्रांनी म्हटलं आहे. राफेल सागरी विमानांमुळे नौदलाची ताकद अनेक पटींनी वाढणार असून ,ही लढाऊ विमानं नौदलाच्या आयएनएस विक्रांत आणि त्यासारख्या विमानवाहू नौकांवर तैनात केली जाणार आहेत. राफेल विमानांमध्ये प्रगत शस्त्र प्रणाली आणि क्षेपणास्त्र असतील.

**<u>केंद्रीयमंत्रीमंडल</u>**

आंध्र प्रदेश आणि तमिळनाडूमधील तिरुपती-पकला-कटपाडी या रेल्वे मार्गाच्या दु-पदरीकरणाला सरकारनं मंजुरी दिली आहे. काल झालेल्या केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीतील निर्णयांची माहिती काल नवी दिल्लीत माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी माध्यमांना दिली. या प्रकल्पामुळे वेल्लोर आणि तिरुपती या शैक्षणिक आणि वैद्यकीय केंद्रांशी संपर्क वाढेल.

केंद्राने पंजाब आणि हरियाणामध्ये पसरलेल्या सहा पदरी झिरकपूर बाह्यवळण रस्त्याच्या कामाच्या प्रस्तावालाही मंजुरी दिली; याचा अंदाजे खर्च एक हजार ८७८ कोटी रुपयांपेक्षा जास्त आहे. या प्रकल्पामुळे प्रवासाचा वेळ कमी होईल आणि हिमाचल प्रदेश आणि नवी दिल्लीदरम्यानचा संपर्क सुधारेल असं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी, म्हटलं आहे.

केंद्रीय मंत्रिमंडळाने एक हजार ६०० कोटी रुपये खर्चाच्या प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेतील परिसर विकास आणि पाणी नियोजन प्रकल्पांच्या आधुनिकीकरणालाही मान्यता दिली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या प्रकल्पामुळे पाण्याचा वापर आणि कार्यक्षमता तसंच उत्पादकता वाढेल आणि शेतकऱ्यांचं उत्पन्नही वाढेल असं म्हटलं आहे.

**<u>राष्ट्रपती</u>**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आणि सोल्वाकियाचे राष्ट्राध्यक्ष पीटर पेलेग्रिनी यांनी काल ब्रातिस्लावा इथे बैठका घेतल्या आणि प्रतिनिधीमंडळ स्तरावरील चर्चा केली. बैठकींदरम्यान, उभय नेत्यांनी द्विपक्षीय संबंधांच्या विविध पैलूंवर आणि सामायिक जागतिक आणि प्रादेशिक हितसंबंधांच्या मुद्द्यांवर चर्चा केली. भारताच्या राष्ट्रीय लघु उद्योग महामंडळ लिमिटेड आणि स्लोवाक व्यवसाय संस्था यांच्यातील सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग क्षेत्रातील सहकार्यावर एक; आणि सुषमा स्वराज परराष्ट्र सेवा संस्था आणि स्लोवाक परराष्ट्र आणि युरोपीय व्यवहार मंत्रालय यांच्या सहकाऱ्यावर एक - असे दोन सामंजस्य करारही यावेळी करण्यात आले.

बैठकीनंतर संयुक्त पत्रकार परिषदेत, राष्ट्रपती मुर्मू यांनी द्विपक्षीय संबंध अधिक मजबूत करण्यासाठी विविध क्षेत्रात अधिक जवळून सहकार्य करण्याच्या दोन्ही देशांच्या मोठ्या क्षमतेवर प्रकाश टाकला.

यावेळी १ ते ४ मे दरम्यान मुंबईत होणाऱ्या भारताच्या आगामी वेव्ह शिखर परिषदेत सहभागी होण्यासाठी राष्ट्रपतींनी स्लोवाकियाला आमंत्रण दिलं.

स्लोवाकिया भेटीच्या पहिल्या दिवशी, राष्ट्रपती मुर्मू यांनी स्लोवाकियाचे पंतप्रधान रॉबर्ट फिको आणि स्लोवाकियाच्या राष्ट्रीय परिषदेचे अध्यक्ष रिचर्ड रासी यांचीही भेट घेतली.

**<u>आरबीआय</u>**

भारतीय रिझर्व्ह बँकेच्या पतधोरण समितीनं सलग दुसऱ्या वेळी रेपो दरात कपात केली आहे. त्यामुळे आता रेपो दर ६ टक्क्यांवर आला आहे. तसंच एसडीएफ दर ५ पूर्णांक ७५ शतांश टक्के आणि एमएसएफ दर ६ पूर्णांक २५ शतांश टक्के करण्यात आला आहे.

सोन्याच्या दरवाढीमुळे किरकोळ महागाई दरात मात्र वाढ होऊन तो ४ पूर्णांक १ दशांश टक्के झाल्याचं आरबीआयनं म्हटलं आहे. जागतिक बाजारातील अस्थिरता, हवामान बदल यामुळे २०२५-२६ मध्ये ग्राहक किंमत निर्देशांक आधारित महागाई दर ४ टक्के राहील असा अंदाज बँकेनं व्यक्त केला आहे.
वर्तमान आर्थिक वर्षात सकल देशांतर्गत उत्पादन विकास दर साडेसहा टक्के असेल. कृषी आणि उत्पादन क्षेत्रात वाढ होईल मात्र सेवा क्षेत्रातली दोलायमान स्थिती कायम राहील असं बँकेचे गव्हर्नर संजय मल्होत्रा यांनी सांगितलं.

ट्रंप

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी चीन वगळता सर्व देशांसाठीच्या प्रत्युत्तर करावर ९० दिवसांचा विराम देण्याची घोषणा केली आहे. एका समाज माध्यमावरील संदेशात, ९० दिवसांची ही सवलत प्रत्युत्तर करावर आणि १० टक्के करांवर लागू होईल असं ट्रम्प यांनी म्हटलं आहे. आमच्या कर योजनेचा भाग म्हणून या कराला ९० दिवसांचा विराम देण्यात येत आहे, मात्र चीनसाठीचा कर तात्काळ १२५ टक्क्यांपर्यंत वाढवत आहोत असं ट्रम्प यांनी म्हटलं आहे. चीनने जागतिक बाजारपेठेला दाखवलेल्या अनादरामुळे - अमेरिकेने चीनवर आकारलेला प्रत्युत्तर कर वाढवला आहे.

काल मध्यरात्रीपासून चीननेही अमेरिकेतून आयात होणाऱ्या सर्व वस्तूंवर ८४ टक्के कर लादून प्रत्युत्तर दिलं आहे. हा कर पूर्वी 34 टक्के होता. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी चिनी वस्तूंवर १०४ टक्के कर लादल्यानंतर बिजिंगने वॉशिंग्टनवर गुंडगिरीचा आरोप करत हे पाऊल उचललं मात्र ट्रम्प यांनी हा कर तात्काळ 125 टक्क्यांपर्यंत वाढवला.
दरम्यान व्हाईट हाऊसने जागतिक व्यापार व्यवस्था आणि जागतिक औद्योगिक आणि पुरवठा साखळींच्या सुरक्षिततेला आणि स्थिरतेला गंभीर नुकसान पोहोचवलं आहे असा आरोप काल प्रकाशित केलेल्या श्वेतपत्रिकेत चीननं केला आहे.

युरोपियन युनियनने अमेरिकन आयात केलेल्या काही वस्तूंवर कर लादण्याच्या बाजूनं मतदान केलं आहे. युरोपियन युनियनच्या सदस्य राष्ट्रांनी युरोपियन युनियनच्या स्टील आणि अॅल्युमिनियम आयातीवर अमेरिकेने समान कर लादल्याचा बदला म्हणून विविध अमेरिकन उत्पादनांवर २५ टक्के कर लावायला मान्यता दिली आहे. नवीन कर २०.९ अब्ज युरो किमतीच्या वस्तूंवर परिणाम करतील.
नवीन कर १५ एप्रिलपासून लागू होतील असं आयोगानं म्हटलं आहे.

**<u>अमेरिकीशुल्क</u>**

अमेरिकेने लादलेल्या परस्पर शुल्कांचे परिणाम भारत काळजीपूर्वक तपासत असल्याचं भारताच्या परराष्ट्र मंत्रालयानं म्हटलं आहे. नवी दिल्लीत माध्यमांशी बोलतांना मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी - भारत आणि अमेरिका परस्पर फायदेशीर, बहु-क्षेत्रीय द्विपक्षीय व्यापार करारावर काम करत असल्याचं सांगितलं.

**<u>पंतप्रधाननवकारमहामंत्र</u>**

हवामान बदल हे सध्याचं सर्वात मोठं संकट असून शाश्वत जीवनशैली हा त्यावरचा उपाय आहे. जैन समाज कित्येक शतकांपासून त्याचा अवलंब करत आहे असं प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. नवकार महामंत्र दिनानिमित्त नवी दिल्लीत आयोजित कार्यक्रमात ते काल बोलत होते.
नवकार महामंत्र विकसित भारताच्या संकल्पनेशी निगडीत आहे असं सांगून पाणी बचत, वृक्षारोपण, स्वच्छता, स्वदेशी, देशांतर्गत पर्यटन, सेंद्रिय शेती, आरोग्यपूर्ण जीवनशैली, योग, खेळ आणि गरीबांची मदत- असे नवसंकल्प करण्याचं आवाहन पंतप्रधान मोदी यांनी केलं. या कार्यक्रमादरम्यान पंतप्रधान मोदी यांच्यासह १०८ देशांतील नागरिकांनी -नवकार महामंत्राचं पठण केलं.

**<u>होमिओपॅथी</u>**

जागतिक होमिओपॅथी दिन आज साजरा केला जात आहे. होमिओपॅथी ही आरोग्य सेवेसाठी समग्र दृष्टिकोन ठेवणारी जगातील दुसरी - सर्वात मोठी वैद्यकीय प्रणाली असून त्यातील नैसर्गिक, अनाक्रमक पद्धतींमुळे लोक हे उपचार पसंत करतात. आयुष मंत्रालयाच्या मते, देशात १० कोटींहून अधिक लोक आरोग्याच्या गरजांसाठी होमिओपॅथीवर विश्वास ठेवतात. सध्या, देशात तीन लाख ४५ हजार नोंदणीकृत होमिओपॅथी डॉक्टर, २७७ रुग्णालयं, आठ हजारांहून अधिक दवाखाने आणि २७७ शैक्षणिक संस्था आहेत.

**<u>नाईटक्लब</u>**

डोमिनिकन रिपब्लिकमध्ये, राजधानी सँटो डोमिंगो इथल्या एका नाईट क्लबचं  छत कोसळून किमान १२४ जणांचा मृत्यू झाला तर १५० हून अधिक जण जखमी झाले आहेत. काल पहाटे गायक रुबी पेरेझ यांच्या संगीत कार्यक्रमात ही घटना घडली. मृतांची संख्या आणखी वाढण्याची भीती आहे.

**<u>तिरंदाजी</u>**

२०२५ च्या तिरंदाजी विश्वचषक स्पर्धेच्या पहिल्या टप्प्यात पुरुषांच्या मिश्र सांघिक स्पर्धेत कास्यपदक मिळवल्यामुळे या स्पर्धेत भारताला पहिलं पदक मिळालं आहे. अभिषेक वर्मा, ऋषभ यादव आणि ओजस देवतळे यांच्या संघानं काल अमेरिकेत ऑबर्न-डेल इथे झालेल्या सामन्यात डेन्मार्कचा २३०-२२३ गुणांनी पराभव केला. विविध देशांमध्ये चार टप्प्यात तिरंदाजी विश्वचषक स्पर्धा सुरू आहेत.

**<u>बॅडमिंटन</u>**

बॅडमिंटनमध्ये, भारताच्या पीव्ही सिंधू, प्रियांशु राजावत आणि किरण जॉर्ज यांनी चीनमधील निंगबो इथे झालेल्या बॅडमिंटन आशियाई अजिंक्यपद स्पर्धेच्या एकेरीच्या प्री-क्वार्टर फायनलमध्ये प्रवेश केला.
दोन वेळा ऑलिंपिक पदक विजेती सिंधू आज सकाळी महिला एकेरीच्या दुसऱ्या फेरीत -  जपानच्या अकाने यामागुची-शी सामना करणार आहे .

**<u>क्रिकेट</u>**

IPL T20 क्रिकेटमध्ये काल अहमदाबाद इथे  गुजरात टायटन्सनं राजस्थान रॉयल्सचा 58 धावांनी पराभव केला. टायटन्सच्या 218 धावांचं आव्हान पेलताना रॉयल्स, विसाव्या षटकापर्यंत - सर्वबाद 159 धावा करु शकला.

# या बरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं, नमस्कार.